Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – १४/०७/२०२४

**दि. १३/०७/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ३९६/२०२४ बी.एन.एस.२०२३ चे कलम १०९, ३५२,३५१(२), आर्म ॲक्ट ३(५),४(२५) महा.पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.११/०७/२०२४ रोजी रात्रौ २०/३० वा. सुमारास रेनबो हॉस्पीटलते संविधान चौकाकडे जाणारे स्पाईन रोडचे सर्व्हीस रोडवर भिमशक्तीनगर कुष्णानगर भाजीमंडईचे जवळ चिखली पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१३/०७/२०२४ रोजी ००/१६ वाजता |
| फिर्यादी | :- | अतुल गणपत बनसोडे वय ३८ वर्षे रा.भिमशक्तीनगर संविधान चौकाजवळ नागलोक पार्क मोरेवस्ती चिखली |
| आरोपी | :- | बारक्या व त्यांचे सोबतचे दोन अनोळखी इसम पैकी एकाने निळी जिन्स पॅन्ट व निळया रंगाचा शर्ट घातलेला इसम व दुसरा काळी पॅन्ट, व तपकिरी रंगाचा शर्ट घातलेला इसम **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद केले तारखेस, वेळी व ठिकाणी फिर्यादी हे कामावरुन घरी जात असताना यातील आरोपी यांनी रिक्षामधुन येवुन फिर्यादी यांना ये आयघाल्या रस्त्याचे बाजुने चालता येत नाही का आंम्ही कोण आहे. तुला माहीती नाही का असे म्हणुन फिर्यादी यांनी सदर आरोपीस शिवीगाळ केली त्याकारणावरुन यातील आरोपी हे फिर्यादी जवळ आले एक इसम म्हणाला की "तु आंम्हाला शिवी दिली, तु बारक्या भाईला ओळखत नाही का," असे म्हणुन फिर्यादीस पाठीमागुन पकडले तेंव्हा दुस-या इसमाने फिर्यादी यांचे पायावर लाथ मारली तेंव्हा फिर्यादी त्यांना म्हणाले मला मारु नका. त्यावेळी आरोपी क्रं १ म्हणाला "तु आंम्हाला ओळखतो तरी शिवीगाळ केली, तुला आता जिवंत सोडणार नाही" असे म्हणुन फिर्यादी यांचे डोक्यात त्याचे हातातील कोयता मारला असता फिर्यादी खाली वाकल्याने सदरचा कोयता फिर्यादी यांचे पाठीवर लागला म्हणुन फिर्यादी जमीनीवर पडलेत्या नंतर कुणाल साठे याने त्याचे हातातील कोयता फिर्यादी यांचे पाठीवर ठिकठिकाणी मारुन फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने गंभीर जखमी केले त्यानंतर निळी जिन्स पॅन्ट व निळया रंगाचा शर्ट घातलेल्या इसमाने फिर्यादी यास "पुढे तु बारक्या भाईला नडलास तर बघ"असे म्हणुन त्याने फिर्यादी यांचे छातीवर, अंगावर ठिकठिकाणी लाथाबुक्यांनी मारहाण केली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | डी. व्ही.मोरे सहा.पोलीस उप-निरीक्षक ९८२३२२५४६० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ३१२/२०२४ भा न्याय सं क ३०९(६),३०८(३), ११५(२), ३५१(२) (३), ३५२,३(५), व क्रिमीनल लॉ अमेडमेंट ३,७ महाराष्ट्र पोलीस ॲक्ट ३७ (१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक १२/०७/२०२४ रोजी २१.०० वा. चे सुमारास बी यु भंडारी स्कायलाईन हाउसिंग सोसायटी अंतरीक्ष कल्ब हाऊसच्या आवारात |
| गुन्हा दाखल | :- | दि.१३/०७/२०२४ रोजी १८/५५ वा |
| फिर्यादी | :- | राजु नामदेव चोरगे, वय - ३९ वर्ष, धंदा - व्यवसाय, रा. भंडारी स्कायलाईन हाउसिंग सोसायटी, दत्तनगर, दिघी १५, ता.हवेली |
| आरोपी | :- | १)समाधान गणेश गंगणे वय १८ वर्षे , २)आकाश आणा मोरे वय २४ वर्षे<br>३)गोपीनाथ किसन जाधव वय २० वर्षे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर हे अंतरीक्ष कल्ब हाऊस येथे येवुन वॉचमन बल बहादुर बिस्ट यास दारु पिण्यासाठी पैसे मागुन त्याला लाकडी दांडक्याने मारहाण करून खिशातील ५००/- रू पैसे जबरदस्तीने काढुन दर महा १०००/- रू हफता/खंडणी मागुन न दिल्यास पाहुन घेण्याची धमकी दिली व क्लब हाउसचे काचा लाकडी दांडक्याने व दगडाने फोडुन नुकसान केले.म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | ए.एम.शिंगारे पोलीस उप निरीक्षक, ८६७९५४७३४२ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ३६४/२०२४भारतीय न्याय संहिता कलम १४०(२),१४२,३०८(३),३(५),३०८(४), ३०८(५), ११५(२), ३५२, ३५१(२) महा.पो.अधि. कलम ३७(१)(अ),१३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१२/०७/२०२४ रोजी १९/३० वा दि.१३/०७/२०२४ रोजी १७/३० वा वाजताचे दरम्यान लंबोदर वॉशिंग सेटर, मोशी, पुणे येथे घडला असे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.१३/०७/२०२४ रोजी २२/४५ वा. |
| फिर्यादी | :- | ब्रिजेश्याम राममिलन यादव वय-४९ वर्षे धंदा- व्यवसाय रा. पुर्णानगर, चिखली प्राधिकरण, पुणे |
| आरोपी | :- | १)बाळासाहेब बांगर, २)प्रविण भालेराव व ३)अशोक (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ याने फिर्यादीने सांगितलेल्या कंपणीचा स्क्रॅपचा माल विकत घेत नाही, म्हणून फिर्यादीला स्क्रॅपचा व्यवसाय करावयाचा असल्यास दरमहा ३,५०,०००/- रुपयाची खंडणीची मागणी करुन,लंबोदर वॉशिंग सेंटर, मोशी, पुणे येथे बोलावुन, आरोपी मजकुर यांनी जबरदस्ती स्वीफ्ट कार नं. एम.एच-१२-जी.एन-०७५३ यात बसवुन, फिर्यादीला कारमध्ये डांबून, मोशी येथुन चाकण तेथुन नाशिक फाटा व पुन्हा मोशी मध्ये आणले तसेच गाडीमध्ये फिर्यादीला मारहाण करुन कोयत्याचा धाक दाखवुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन फिर्यादीकडुन जबरदस्तीने आरोपी क्रं २ याच्या फोन पे नंबर ९०२८२४५०१० यावर ५५,०००/- रुपये ट्रान्सफर करुन घेतले तसेच रोख १,००,०००/- रुपये घेवुन फिर्यादीस २२/३० वाजता मोशि येथे सोडुन दिले. व दि.. १३/०७/२०२४ रोजी इसम आरोपी क्रं ३ याने लंबोदर वॉशिंग सेटर, मोशी, पुणे येथे फिर्यादीकडुन १,५०,०००/- रुपये स्विकारले. व फोन करुन पुन्हा ५०,०००/- रुपये खंडणीची मागणी केली आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | | सपोनि पठारे सो पो.स्टे.पिं.चिं.मो.नं.८८८८८१०९५७ |

०४

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ३९८/२०२४ भादवि कलम ४०६,४२०,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ऑगस्ट २०२० पासुन ते आजपावेतो नक्षत्र फेज-२ ए-विंग-८०१ पुर्णानगर,चिंचवड,पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१३.०७.२०२४ रोजी १८/५३ वाजता. |
| फिर्यादी | :- | श्वेतांक राजेंद्र शिंदे वय २८ वर्ष धंदा-व्यवसाय, राह. पसायदाननगर,सर्व्हे नंबर ६४/२, वडगांव रोड,आळंदी, राममंदिराचे मागे |
| आरोपी | :- | १)किरीटकुमार कन्हैय्यालाल पटेल,वय-४३ वर्षरा.नक्षत्र फेज-२ ए-विंग-८०१ पुर्णानगर,चिंचवड,पुणे मुळ पत्ता माहित नाही २)किरीटकुमार याची पत्नी काजल प्रागडा वय अं. ३५ वर्ष,<br>३)किरीटकुमार याची दुसरी पत्नी शिल्पाबेन पटेल,वय अं.४० वर्ष<br>४)किरीटकुमार पटेल याचा अकाऊटंट गजानन भास्कर देशपांडे,वय अं.४२ वर्ष रा.राममंदीराजवळ,देशपांडे गल्ली आष्टी **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेच वेळी व ठिकाणी गुन्हयातील आरोपी यांनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना लंडनमध्ये नोकरी लावतो असे आमिश दाखुवन त्यांचा विश्वास संपादन केला.तसेच नोकरीसाठी डिपॉझीट रक्कम भरावी लागेल,लंडनमध्ये परमनन्ट विसा काढण्यासाठी व लंडनमध्ये राहण्यासाठी घर भाडयाने घेण्यासाठी अशी वेळोवेळी रकमेची मागणी करुन फिर्यादी व साक्षीदार यांचेकडुन १६,१४,०२१/- रुपये रक्कम स्वीकारुन त्यांना नोकरी न लावता त्यांची फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | एस.एस.देवकर ,पोलीस उपनिरीक्षक नं ९६५७८०४६५५ |

.५

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड २८६/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०५(१),३३१(१) (२) (३) (४) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०७/२०२४ रोजी २०/०० वाजण्याचे सुमारास दि.१२/०७/२०२४ रोजी सकाळी ०९/०० वा फलॅट नंबर ३०२, विमलअपार्टमेंट, सुदर्शननगर, चिंचवड पुणे व बी/५, इंद्रलोक अपार्टमेंट, सुदर्शननगर चिंचवड पुणे व विराज अपार्टमेंट,गोलांड इस्टेट शेजारी सुदर्शननगर चिंचवड |
| गुन्हा दाखल | :- | दि.१३/०७/२०२४ रोजी १५.१२ वा |
| फिर्यादी | :- | निलेश राजेंद्र आळंदे वय - ३६ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा.फलॅट नंबर ३०२, विमल अपार्टमेंट, सुदर्शननगर, चिंचवड पुणे मुळ पत्ता रा प्लॉट नंबर १९,महसुल हौसींग सोसायटी, गणेशकॉलनी साक्री रोड धुळे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे व त्यांचे राहते घराचे परिसरातील चेतन भारत ठाकरे व मनोज कांतीलाल मोदी यांचे राहते घराचे दरवाजाचे लॅच लॉक व कुलुप कशाचेतरी साहयाने तोडुन दरवाजावाटे आत प्रवेश करुन घरामधील कपाटाचे लॉक तोडुन एकुण ५,१९,०००/- रु किं चे १०.५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने, रोख रक्कम, घडयाळ वरील मुददेमाल स्वतःचे आर्थिक फायदयाकरिता घरफोडी करुन चोरुन घेवुन गेला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि राम जाधव ९४२३२८६३२३ |

०६

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ६४२/२०२४ बी.एन.एस कलम ३०५(अ) प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०९/०७/२०२४ रोजी १३/०० वा पासुन ते दिनांक १२/०७/२०२४ रोजी १२/०० वा चे दरम्यान भैरवनाथ मंदिराचे मागे, खराडे वाडा, पिंपरीगाव, पिंपरी पुणे येथील फिर्यादी यांचे घरातुन |
| गुन्हा दाखल | :- | दि.१३/०७/२०२४ रोजी १८.०१ वा. |
| फिर्यादी | :- | गणेश ज्ञानेश्वर खराडे. वय ४८ वर्षे, व्यवसाय.- शेती व व्यवसाय, रा.- भैरवनाथ मंदिराचे मागे, खराडे वाडा, पिंपरीगाव, पिंपरी पुणे. |
| आरोपी | :- | अज्ञात आरोपी |
| तपशिल | :- | नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे उघड्या दरवाज्यावाटे घरात प्रवेश करुन लबाडीच्या इराद्याने १३,००,०००/- रु रोख रक्कम चोरुन नेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | शाकीर जिनेडी पोलीस उप निरीक्षक ८३०८८६७५०० |

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ४८३/२०२४ भादवि का.क २७९, ३०४(अ), ४२७ मो.वा.का.क. १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१८/०६/२०२४ रोजी १५.४० वा.चे सुमा. मौजे वाकी खुर्द गावचे हद्दीत नाशिक पुणे रोडवर संत गैरबा यांचे मंदीर, बंदुक घर जवळ |
| गुन्हा दाखल | :- | दि १३/०७/२०२४ रोजी १८.३५ वा |
| फिर्यादी | :- | महेश दादाराव पाटील, वय २६ वर्ष, धंदा ड्रायव्हर, रा. रायकर मळा, धायरी, सद्गुरू प्राईट, बी व्हिंग रूम नंबर ३०१, ता. हवेली,जि पुणे मूळ गाव पोहरगाव ता.पंढरपूर, जि सोलापूर |
| आरोपी | :- | ज्ञानेश्वर सांडभोर ,वय ५० वर्ष रा. सांडभोरवाडी, ता. खेड, जि.पुणे |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी त्यांचे ताब्यातील स्विफ्ट डिझायर गाडी नंबर. एम.एच.१२/आर.एन.१४६३ ही नाशिक बाजुकडुन चाकण बाजुकडे चालवित जात असताना ज्युपिटर गाडी नंबर. एम.एच.१४/एच.वाय.१६९४ ही वरील चालक आरोपीत याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात चालवुन रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन फिर्यादी यांचे गाडीस धडक देऊन अपघात करून त्यामध्ये स्वताः जखमी होऊन त्यामध्ये उपचारा दरम्यान स्वताःचे मरणास तसेच दोन्ही वाहनाचे नुकसानीस कारणीभूत झाला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सहा पो फौज मोरे मो.नं.९८३३९८३२९१ |

०८

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ६४५/२०२४, भादवि कलम- ४२०,४०६,३४ माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०७/१२/२०२३ रोजी पासुन अदयाप पर्यत मोरवाडी, पिंपरी पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.१४/०७/२०२४ रोजी ००.१९ वा. |
| फिर्यादी | :- | पुरूष फिर्यादी वय ५२ वर्षे, धंदा नोकरी, रा.पिंपरी, पुणे. |
| आरोपी | :- | १)लिंडा मेहता , पुर्ण नाव पत्ता माहीत नाही २)कुणाल सिंग, पुर्ण नाव पत्ता माहीत नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीस फेसबुक अकाउंट वरुन एक जाहीरात आली ती जाहीरात फिर्यादीने सबस्क्राईल केली तेव्हा फिर्यादीस आरोपी क्रं १ यांनी कॅपीटल अलायन्स या व्हॉटसअप ग्रुपला ॲड केले व तुम्ही कॅपीटल अलायन्स मध्ये गुंतवणुक करा त्यामध्ये तुमचे पैसे ३०० टक्के वाढतील असे सांगीतले. त्यानंतर दि १०/०१/२०२४ रोजी आरोपी क्रं १ काम करत असलेल्या कॅपीटल अलायन्सचे मालक आरोपी क्रं २ यांनी फिर्यादीस व्हॉटसअप वरुन मेसेज करुन तुम्हाला जर जास्त फायदा हवा असेल तर तुम्हाला अप्पर सर्कीट मध्ये काम करावे लागेल व त्यासाठी तुम्हाला इन्टीटयुशन अकाउंट(प्रीवीलीज) खोलावे लागेल असे सांगीतले असता Skyrim Capital या प्लॅटफॉर्मवर खोलले त्याचा अकाउंट नंबर WI-162481 असा असुन त्यानंतर आरोपी क्रं १ हिने फिर्यादीस व्हॉटसअप मेसेजद्वारे मेसेज करुन एन.आर.जे. फायनान्सीयल सर्व्हीस या अकाउंट वर पैसे पाठवीण्यास सांगीतले असता फिर्यादीने त्यांच्या एच.डी.एफ.सी. अकाउंट वरुन एन.आर.जे. फायनान्स सर्व्हीस या अकाउंट वर एकुण ४,१०,०००/- व एच.डी.एफ.सी. अकाउंट वरुन ग्रॅण्ड ड्रिम सर्व्हीसेस या अकाउंट वर एकुण ४,५०,०००/- आर.टी.जी.एस द्वारे पाठवीले. त्यानंतर फिर्यादीने पाठविलेले सर्व पैसे Skyrim Capital या प्लॅटफॉर्मवर दिसु लागले. त्यामधुन फिर्यादीने जुपीटर इंन्फोमीडीया, अंबालाल साराभाई एन्टरप्रायजेस, केसीके ली., नॅशनल स्टॅण्डर्ड इंडिया ली., इंद्रायणी बायोटेक ली. मालुपेपर, काकाटकॅम असे स्टॉक खरेदी केले व बाबेजा स्टुडीओस असा आयपीओ खरेदी केला. त्यानंतर दोन महीण्यांनी फिर्यादीच्या Skyrim Capital या प्लॅटफॉर्मवर ११,१८,२५६/- रुपये दिसु लागले. तेव्हा आरोपी क्रं २ याने गुंतवणुकदारांना तुम्ही Skyrim Capital सोबत संपर्क करुन तुमचे पैसे काढुन घ्या फिर्यादीने माझा ३०० टक्के चा प्लॅन पुर्ण झाला आहे असे व्हाटसअप द्वारे कळवीले त्यावेळी फिर्यादी पैसे काढायला गेले तेव्हा Skyrim Capital मधील ॲमीलीया हिने फिर्यादीस तुम्हाला १,६७,७३८/- रुपये भरावा लागेल असे सांगीतले असता फिर्यादीने त्यांना तुम्ही माझ्या टॅक्सचे पैसे वजा करुन उर्वरीत रक्कम परत दया असे सांगीतले असता त्यांनी तसे न करता फिर्यादीस Skyrim Capital या प्लॅटफॉर्मवरुन ब्लॉक केले आणी आरोपी मजकुर यांनी देखील फिर्यादीशी संपर्क बंद केला अशा प्रकारे आरोपी मजकुर यांनी संगणमत करुन फिर्यादीची ८,६०,०००/- रु ची फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि आटवे मो नं ९८८१८७०४२३ |